● शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मजबुत संघटन बांधणी करुन नव्या जोमाने कामाला लागा - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे



**जालना । प्रतिनिधी -** कोणी पक्षातून गेल्याने पक्ष संपत नसतो. पक्षाने अनेक वादळे पाहिली असून त्यानंतर पक्ष पुन्हा मजबुतीने वेळोवेळी उभा राहिलेला आहे. पक्षातील काही लोकांनी इतर पक्षात प्रवेश केल्याने पक्षातील जुने निष्ठावंत पदाधिकारी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे आगामी काळात येणार्या सर्व निवडणुकां पक्ष अत्यंत नियोजनबध्द व ताकदीने लढणार असल्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

जालना शहरातील मस्तगड येथील शिवसेना भवन येथे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी आयोजित केलेल्या शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकार्यांची बैठक आज १४ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्यातील मतदार संघनिहाय रिक्त पदाधिकार्यांच्या माहितीचा आढावा घेण्यात आला. तसेच घनसावंगी, मंठा, परतुर, जालना येथील रिक्त पदावर प्रभारी तालुकाप्रमुखांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या. यावेळी व्यासपीठावर संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर,उपनेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, मुरलीधर शेजुळ, भगवानराव कदम, रमेश गव्हाड, बाबुराव पवार, हनुमान धांडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पदाधिकार्यांशी पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, राज्यात लोकसभा, विधानसभा निवडणुकी अगोदर व नंतर अनेक पदाधिकार्यांनी पक्ष सोडला. परंतु कोणी पक्षातून बाहेर पडल्याने शिवसैनिक व पदाधिकार्यांनी खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने पक्ष बांधणी करुन मजबुतीने उभे राहावे, असे आवाहन केले. यावेळी बोलतांना संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर म्हणाले की, पक्षांतराने रिक्त झालेल्या पदाधिकार्यांच्या जागा तात्काळ भरल्या जाणार असून पक्ष संघटन मजबुत केले जाईल. पक्षात अनेक निष्ठावंत इच्छुकांची मोठी यादी आहे. संघटनेतील प्रत्येक पदाधिकार्यांस न्याय देण्याची भुमिका पक्षाची असल्याने आगामी काळातही येणार्या स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकांत अनेकांना संधी दिली जाणार असून त्यांनी आपल्या आपल्या कार्यक्षेत्रात पक्ष संघटन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, नागरिक व सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले.

**आगामी काळ पक्षासाठी उज्वलच - जिल्हाप्रमुख अंबेकर**

यावेळी बोलतांना शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार पराभुत झाले असले तरी जिल्ह्यात मतदारांनी मोठ्या प्रमाणावर त्यांना मतदान केले. हे आपणास विसरुन चालणार नाही. जिल्ह्यात अनेक मतदार संघात बंडखोर्या झाल्या तरी सामान्य नागरिक पक्षाच्या विचारधारेला मानणारा असल्याने त्याने पक्षाला भरभरुन मतदान केले. नुकत्याच घडलेल्या काही पक्षांतराच्या घडामोडीमुळे शिवसैनिकांनी खचून न जाता सामान्य नागरिक, शेतकर्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करावा व ते सोडविण्यासाठी तसेच शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न करावेत, एकजुठीने काम केल्यास आगामी काळ पक्षासाठी उज्वलच असेल असेही जिल्हाप्रमुख भास्कराव अंबेकर म्हणाले. यावेळी माजी सभापती अशोकराव आघाव, देवनाथ जाधव, महिला आघाडीच्या मंगल मेटकर, तालुकाप्रमुख जयप्रकाश चव्हाण, अशोक बर्डे, कुंडलिक मुठ्ठे, शहरप्रमुख बाला परदेशी,घनश्याम खाकीवाले, विनायक चोथे,गणेश काळे, मधुकर साळवे, कुमार रुपवते, नंदकिशोर पुंड, संदीप कंटुले, प्रदीप बोराडे, जे.के.चव्हाण, प्रभाकर उगले, पंडीत क्षिरसागर, रामजी गायकवाड, राजु जाधव, संदीप मगर, कारभारी म्हसलेकर, बबनराव मिसाळ, शंकर बेंद्रे, विष्णुपंत गिराम, परमेश्वर चंद, तुळशीदास काळे, वसीम पठाण, जनार्दशन गिराम, ज्ञानोबा काकडे, अशोक राजेजाधव, संतोष खरात, नरहरी तांगडे, राजेंद्र तांगडे, प्रभु बम्हे, रजनिश कनके, सुनिल मिसाळ, श्याम राठोड, अर्जुन ठोंबरे, श्रीराम कान्हेरे,सुदाम काळे, कृष्णा खांडेकर, जीवन खंडागळे, शंकर जाधव, दिपक खरात, हरी शेळके, रमेश वर्हाडि, संदीप सदावर्ते, समाधन सवडे, संदीप काकडे, अंकुश पवार, मधुकर खरात, किसान राठोड, केशव क्षिरसागर, संजय जाधव, एन.डी. कडोस यांच्यासह शेकडो शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## भागवत हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ-राहुल महाराज जोशी

### हभप दिनेश महाराज उंडे यांचे आज हरिकिर्तन

**जालना । प्रतिनिधी -** भागवत ग्रंथ हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून त्याचे श्रवण प्रत्येकाने केलेच पाहिजे, असा हितोपदेश हभप राहुल महाराज जोशी यांनी येथे बोलतांना दिला. येथील सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प. पू. भगवान महाराज आनंदगडकर यांच्या कृपाशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा व विजय ग्रंथ पारायण सोहळ्यास उत्साही वातावरणात प्रारंभ झाला आहे. यावेळी आयोजित भागवत कथेचे प्रथम पुष्प गुंफतांना राहुल म. जोशी हे बोलत होते. दरम्यान, उद्या शनिवारी दिनेश महाराज उंडे (देवाची आळंदी) यांचे हरिकिर्तन होणार आहे.

पुढे बोलतांना जोशी महाराज म्हणाले की, श्रीमद् भागवत ग्रंथाला सर्वश्रेष्ठ माणन्याचे काही प्रमाण शास्त्रात दिले आहेत. त्याचे अनुकरण करण्याची जबाबदारी आपणा सर्वाची आहे. जन्मोजन्मीचं पुण्य यामुळे प्राप्त होतं. आज भागवत कथेचा प्रथम दिवस आहे. परंतू भागवत कथा कोणी कोणाला सांगितली. याबद्दल आपण सर्व जाणतो. यावेळी त्यांनी नारदमुनी, अहंकार, सुत, देवऋषी, देवी भागवत यांचीही कथा अत्यंत सुंदर असे वर्णन करुन सांगितली. त्यांनी यावेळी विविध भजनं आपल्या कथेदरम्यान गायिली. त्यात मस्तक माझे पायावरी । या हो वारकरी संताच्या ।। या भजनाचाही समावेश होता.



या सप्ताहात रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी हभप सोनवणे महाराज गुरुजी, सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी राजेद्र महाराज वाघमारे आणि मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी हभप श्रीहरी रसाळ महाराज तर बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी हभप प्रा. उध्दव महाराज राऊत (आळंदी), गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी हभप त्रिंबक महाराज दस्तापुरकर यांचे हरिकिर्तन होणार असून शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तर याच दिवशी तत्पूर्वी श्री. गजानन महाराज पालखी मिरवणूक (दिंडी) सोहळा होणार आहे. यानिमित्त भरगच्च धार्मिक कार्यक्रम होणार असून दररोज सकाळी काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, श्री. गजानन विजय ग्रंथ पारायण, त्यानंतर गाथा भजन तर दुपारी १ ते ५ यावेळेत श्री. भागवत कथा होणार आहे. तर सायंकाळी हरिपाठ व रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन व त्यानंतर हरीजागर होणार आहे. तत्पूर्वी भागवत पुजन व समाप्ती महाआरती सौ. व श्री. सिमा शामराव भांदरगे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रगट दिनाचा महाप्रसादाचे मुख्य यजमान सौ. व श्री. सरिता दत्तात्रय शेजुळ हे राहणार असून भजनी मंडळ आणि किर्तन सेवेस साथ देणार आहेत मृदंगाचार्य हभप भगवान म. जाधव व तुकाराम म. मुढे, गायनाचार्य हभप हभप विष्णू म. सावंत हे ज्ञानेश्वर म. जोशी, भगवान म. लकडे, गिरी महाराज, रमेश प. पवार, यादव म. जाधव, उध्दव म. राठोड तर हरिपाठाचे नेतृत्व हभप विष्णू म. सावंत हे करणार आहे. तर श्री गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण व्यासपीठ प्रमुख म्हणून हभप आत्माराम महाराज बिडवे हे काम पाहत आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. गजानन महाराज विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. सपंतराव पाटील व समस्त विश्वस्तांनी केले आहे.

## शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण जाफराबाद तालुक्यात सुरू



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षकांना सक्षमीकरण करण्यासाठी शिक्षक समृद्धी २.0 हे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जाफराबाद तालुका गटशिक्षणाधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने ही प्रशिक्षण सुरू आहे. या प्रशिक्षणाचे जाफराबाद तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून वसंतराव शेवाळे तर प्रशिक्षणाची टीमचे प्रमुख म्हणून नारायण पिंपळे हे काम पाहत असून या प्रशिक्षणामध्ये एकूण आठ तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करीत आहे. यात प्रमुख मार्गदर्शन म्हणून तथा राज्य तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, डॉक्टर आनंदराव जाधव, तज्ञ मार्गदर्शक म्हणून दत्ता गवळी, काशिनाथ उखर्डे, माधव शिंदे, गजानन अंभोरे, बीटी शिंदे, बंड, तसेच गट साधन केंद्राचे चव्हाण, आल्हाट, हे प्रशिक्षण जाफराबाद येथील प्रसिद्ध महाविद्यालय यश महाविद्यालय येथे संपन्न होत आहें. नुकतेच या प्रशिक्षणाचे उद्घाटन संपन्न झाले. या प्रशिक्षणास कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून यश महाविद्यालयाचे प्राचार्य जोशी, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख वाघ, समन्वयक शेवाळे, नारायण पिंपळे, सर्व तज्ञ मार्गदर्शक, तर प्रथम बॅचे सर्व पहिली ते बारावी पर्यंतचे शिक्षक या ठिकाणी उपस्थित होते. हे प्रशिक्षण एकूण पाच बॅचमध्ये होत असून प्रत्येक बॅचचे पाच दिवसाचे प्रशिक्षण आहे. या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा **पान २ वर**

## जय छत्रपती जय शिवाजी भारत पदयात्राचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** आयुक्त क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि. १० फेब्रुवारी, २०२५ रोजी ऑनलाईन बैठकीत दिलेल्या सुचनानुसार दि. १९ फेब्रुवारी २०२५



रोजी सकाळी ७.00 वाजता जय छत्रपती जय शिवाजी भारत पदयात्रा छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून (मोतीबाग) सुरुवात करुन कचेरी रोड-गांधी चमन-मंमादेवी मंदिर-पाणीवेश-काद्राबाद मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास माळा अर्पण करुन पुर्ण करण्यात येणार आहे. या पदयात्रेस जालना जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती राहणार आहे. सर्व शाळा/ महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षकांसह एनसीसी, एनएसएस, स्काऊट/गाईडस विद्यार्थी यांना पदयात्रेस सहभागी करावेत तसेच सर्व क्रीडा संघटना पदाधिकारी व खेळाडू यांनी पदयात्रेला मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन, जिल्हा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महसुल क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे उद्घाटन



**जालना । प्रतिनिधी -** महसूल विभाग हा राज्य शासनाचा कणा असून, महसूल विभागामार्फत आपत्ती व्यवस्थापन, भूसंपादन, अन्न धान्य पूरवठा, गौण खनिज, निवडणुकासह राज्य शासनाच्या महत्वकांक्षी योजना प्रभावीपणे राबविल्या जातात. हि सर्व कामे करतांना अधिकारी-कर्मचार्यांवर अतिरिक्त ताण व तणाव हा कायम असतो. हा ताण-तणाव कमी करुन मानसीक संतुलन ठेवण्यासाठी दररोज शारिरीक व्यायाम हा आज अत्यावश्यक आहे, त्यामुळे अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास, व पंचायत राज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषधी प्रशासन विभागाचे राज्य मंत्री योगेश ज्योती रामदास कदम यांनी केले.

येथील पोलीस कवायत मैदान जालना येथे छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा - २०२५ चे दि. १४ ते १६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले. त्याच्या उद्घाटन प्रसंगी महसुल राज्य मंत्री श्री. कदम हे बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री राजेश राठोड, अर्जून खोतकर, नारायण कुचे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विभागीय सह आयुक्त अनंत गव्हाणे, विभागीय सह आयुक्त श्रीमती नयना बोदांर्डे, जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, लातूरच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, परभणीचे अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, तहसिलदार/नायब तहसिलदार संघटनेचे विभागीय अध्यक्ष विजय चव्हाण, महसूल कर्मचारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष लक्ष्मण नरमवार, तलाठी संघटनेचे राज्य अध्यक्ष संदीप नरुरे आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. कदम म्हणाले की, दैनंदिन कार्यपध्दतीमुळे तसेच सतत वाढत असलेल्या कार्यालयीन कामकाजामुळे मानसिक ताण-तणाव वाढत आहे. यामुळे अनेकांना आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागते. याकरीता सर्वांनी सर्वप्रथम आपल्या आरोग्याकडे आणि आपल्या कुंटूंबाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. याकरीता दररोज स्वतःसाठी किमान एक तास काढून व्यायाम करणे आवश्यक आहे. अशाप्रकारच्या क्रिडा स्पर्धांमुळे कर्मचार्यांचा मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. जालना येथे विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही आयोजन केले आहे. या माध्यमातून अधिकारी-कर्मचारी यांना त्यांच्या सुप्त कलागुण सादर करण्याची देखील संधी उपलब्ध होणार आहे. तीन दिवस होणार्या या स्पर्धेचा सर्वांनी आनंद घ्यावा. जालना जिल्हा प्रशासनाने अतिशय चांगल्याप्रकारे या स्पर्धांचे आयोजन केल्याने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे अभिनंदन मी करतो. तसेच महसुल कर्मचार्यांनी शिस्तबध्द केलेल्या पथसंचालनाचे त्यांनी यावेळी कौतुक केले. तसेच महसुल क्रिडा महोत्सवाच्या आयोजनासाठी वाढीव निधीची मागणी तसेच महसूल संघटनानी केलेल्या विविध मागण्या आपण महसुल मंत्री यांच्या समोर ठेवून, याकरीता पाठपूरावा करणार असल्याची त्यांनी यावेळी ग्वाही दिली.

यावेळी आमदार राजेश राठोड म्हणाले की, दैनंदिन कामकाज करतांना कर्मचार्यांवर अधिकच्या कामांचा ताण नेहमी असतो. याकरीता अशा स्पर्धांमुळे अधिकारी-कर्मचारी यांचा ताण-तणाव कमी होण्यास नक्कीच मदत होते.

आमदार नारायण कुचे म्हणाले की, महसूल विभाग हा राज्य शासनाचा प्रतिनिधीत्व करणारा विभाग आहे. त्यामुळे या विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर नेहमीच अधिकच्या कामाचा ताण असतो. ताण-तणावमुक्त करण्याबरोबर आरोग्य चांगले ठेवण्यासाठी क्रीडा स्पर्धां अत्यंत महत्वाच्या आहेत. शरीर सुदृढ असल्यास कोणत्याही ताण-तणावाला सहज सामोरे जाता येते. तसेच महसुल विभागाच्या ज्या काही मागण्या आहेत, **पान २ वर**

# संपादकीय

## थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# महाकुंभपर्वातील सनातनच्या ग्रंथप्रदर्शनाला ७५ हजारांहून अधिक भाविकांनी दिली भेट!

## अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेपाळ देशांतील भाविकांनी दिली भेट!

**प्रयागराज । प्रतिनिधी** - महाकुंभक्षेत्री सेक्टर क्र. १९ मधील मोरी-मुक्ती मार्ग चौक येथे लावण्यात आलेल्या सनातनच्या ग्रंथ आणि फलक प्रदर्शनाला साधू-संत, भाविक, तसेच मान्यवर यांच्याकडून उत्सर्फूत प्रतिसाद लाभला. १० जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत या ग्रंथप्रदर्शनाला एकूण ७५ हजारांहून भाविकांनी भेट दिली. यामध्ये भारतातील अनेक राज्यांसह अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेपाळ आदी देशांतील भाविकांचा समावेश आहे.

या प्रदर्शनात अध्यात्म, आयुर्वेद, बालसंस्कार, धर्मशास्त्र, आपत्काळ आदी विषयांवरील ग्रंथ बंगाली, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मराठी, उडिया, तामिळ आणि तेलुगु या भाषांमध्ये उपलब्ध आहेत. या सर्व ग्रंथांमध्ये प्रामुख्याने आचारधर्मावर आधारित ग्रंथांकडे (उदा. देवळात दर्शन कसे घ्यावे ?', 'प्रदक्षिणा कशा घालाव्यात ?' इ.) भाविकांचा सर्वाधिक कल असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे सनातनच्या सर्व भाषांतील ग्रंथांपैकी बंगाली भाषेतील ग्रंथांना सर्वाधिक मागणी आहे. या प्रदर्शस्थळी लावण्यात आलेल्या फलक प्रदर्शनालाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेकांनी स्वतःच्या भ्रमणभाषमध्ये या सर्व फलकांची छायाचित्रे काढून घेतली.

यासह सनातनच्या वतीने ई-रिक्शा, फिरते ग्रंथप्रदर्शन, म्हणजेच 'मोबाईल स्टॉल' आदी माध्यमांतूनही ११ हजारांहून अधिक जिज्ञासूंनी सनातनच्या ग्रंथांचा लाभ घेतला.

अनेक जिज्ञासूंनी त्यांच्या राज्यांमध्ये सनातनच्या ग्रंथ वितरणासाठी जागा उपलब्ध करून देऊन सनातनच्या कार्यात सहभागी होण्याचे आश्वासन दिले.

सनातनचे ग्रंथ 'ऑनलाईन' उपलब्ध ! : सनातनचे विविध विषयांवरील १३ भाषांतील ग्रंथ आणि सात्त्विक उत्पादने "https://sanatanshop.com/' या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.



# अथर्व स्कूल ऑफ बिझनेस (पीजीडीएम) विद्यार्थ्यांचा फ्रान्स व बेल्जियम अभ्यास दौरा




अथर्व ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स मुंबई च्या अथर्व स्कूल ऑफ बिझनेसने (SB) जागतिक व्यवसाय ज्ञानाचा अनुभव देण्यासाठी पीजीडीएम विद्यार्थ्यांसाठी फ्रान्स व बेल्जियम येथे अभ्यास दौरा आयोजित केला. कार्याध्यक्ष श्री. सुनील राणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. श्री सुनील राणे यांनी विद्यार्थ्यांसोबत एक अर्थपूर्ण संवाद साधला, ज्यामध्ये जागतिक व्यवस्थापनाचे महत्त्व , कौशल्य व भारत आणि फ्रान्स या देशांमधील विविध सामंजस करारांबाबत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये सहभागाची गरज यावर भर दिला.

विद्यार्थ्यांनी वित्त, तंत्रज्ञान आणि लक्झरी गुड्ससारख्या प्रमुख उद्योगांशी संवाद साधला. स्टार्टअप्स, मल्टिनॅशनल कंपन्या आणि उद्योजकांसोबत चर्चांमधून त्यांना जागतिक व्यवसाय ट्रेंड व सर्वोत्तम व्यवस्थापन पद्धतींची प्रत्यक्ष माहिती मिळाली. तसेच, उद्योगभेटी, नेटवर्किंग सत्रे आणि ज्ञानवर्धन उपक्रमांनी त्यांचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील समज अधिक दृढ केली.

आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोन मिळावा यासाठी अशा अभ्यास दौऱ्यांचे आयोजन महत्त्वाचे आहे. हा दौरा त्यांच्या व्यवसायिक क्षमतेत मोठी भर घालणारा ठरला. पीजीडीएम हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास सक्षम आहे.

# नृत्यरंजन' या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे अशोका पब्लिक स्कूलच्या वतीने आवाहन

**मंठा । प्रतिनिधी-** सालाबादप्रमाणे या ही वर्षी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. निसर्गातील ६४ कलेमध्ये काही बालके पारंगत असतात . त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्था मार्फत सांस्कृतिक कार्यक्रम आगळ्यावेगळ्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

अशोका पब्लिक स्कूल व छत्रपती संभाजीराजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हेलस या शाळांचा संयुक्त ' नृत्यरंजन' कार्यक्रम दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६:०५ वाजता जगद्गुरु संत तुकाराम नगर येथील श्री गणेश लॉन्स उस्वद रोड मंठा या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे.

सिने कलाकार व मिमिक्री करणारे रेणूका विसपुते हे कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तरी मंठा शहरातील व परिसरातील जास्तीत जास्त पालक ,शिक्षक शहरवासीयांनी या कला अविष्काराचा आस्वाद घ्यावा. असे आवाहन अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्था व अशोका पब्लिक स्कूल मंठा व छत्रपती संभाजीराजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय केलस च्या वतीने करण्यात आले आहे.

# आमचे प्रयत्न सफल झाले - पुरावे दाखवा!

## मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके



**परतूर । प्रतिनिधी -** माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे परतूर तालुक्यातील डांबरीकरण रस्त्याच्या कामासाठी ८ कोटी १० लाख रुपये निधी मंजूर झाला होता. आज ही सर्व कामे पूर्ण झाली आहेत. तसेच, आम्ही मुख्यमंत्री महोदयांशी थेट संपर्क साधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शेवगा, सिंगोना, लिंगसा, दैठणा खुर्द येथे सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी ४० लाख रुपये निधी मंजूर करून आणला.

परंतु, आ. बबन लोणीकर यांनी या कामांसाठी निधी मंजूर करून आणल्याचा दावा केला आहे. वास्तविकता अशी आहे की, या चारही ग्रामपंचायती भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात नाहीत. मग, ज्या ग्रामपंचायती त्यांच्याच ताब्यात नव्हत्या त्यांना निधी मंजूर केल्याचा दावा ते कसा करू शकतात?

गेल्या अनेक वर्षांपासून मा. बबन लोणीकर यांनी या गावांना विकासापासून वंचित ठेवले होते. मग आता अचानक त्यांनी निधी मंजूर केल्याचा दावा कसा केला? नुसते दावे करून चालणार नाही - जनतेसमोर ठोस पुरावे द्या!

# आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर शहरात मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

## शिष्टमंडळाचे महापालिका व महावितरणला साकडे



**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम समाजाचा २ मार्चपासून सुरू होत असलेला पवित्र रमजान महिना व हिंदू समाजाचे आगामी सण विचारात घेता जालना महानगरपालिकेने जालना शहरात मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच महावितरणने वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी एका शिष्टमंडळाने जालना महानगरपालिकेचे आयुक्त आणि महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे.

यासंदर्भात शिष्टमंडळाने आज शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्त आणि महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २ मार्चपासून मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. तसेच फेब्रुवारी ते एप्रिलदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज जयंती, रामनवमी, हनुमान जयंती, परशुराम जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी हिंदूधर्मियांचे विविध येत आहेत. सध्या जालना शहरात मुलभूत सुविधा मिळणे मुश्कील होवून बसले आहे. पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. पूर्वीप्रमाणे स्वच्छता होत नाही. आगामी सण समोर ठेवून मुस्लीम व हिंदू समाजाची गैरसोय होवू नये म्हणून जालना महानगर पालिकेने तात्काळ मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शहरातील बहुतांश भागातील पथदिवे बंद आहेत. त्यामळे मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. अनेक जण सकाळी ५ वाजता मॉर्निंग वॉकसाठी जातात. रमजान महिन्यात मुस्लीम बांधव नमाजासाठी मस्जीदमध्ये जातात. तसेच हिंदू बांधव सण उत्सवासाठी मंदीरात जातात. पथदिवे बंद असल्याने त्यांना अंधाराचा सामना करावा लागतो. त्यामुळे बंद पथदिवे दुरुस्त करावेत. रमजानच्या शेवटच्या ८ दिवसात फूले मार्केट येथे बाजार लागतो. त्याला रितसर परवानगी देवून व्यापाऱ्यांना व्यापाराची संधी उपलब्ध करून द्यावी. बिलाल मस्जीद येथे वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहर वाहतूक पोलीसांना निर्देशित करावे. तेथेही बाजारासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. जुना जालना विभागातील दुःखीनगर या मेन रोडवर तसेच मिलन चौक ते मुजाहेद चौक येथील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यात यावी. रमजान व सण उत्सवाच्या काळात कुणाचीही गैरसोय होवू नये यासाठी सुरळीत पाणी पुरवठा करावा. उन्हाळ्यात अतीउष्णतेने डीपी जळणे, केबल वायर तुटणे असे प्रकार घडतात. अशावेळी महावितरण तात्काळ दुरुस्ती करत नाही. खंडीत वीज पुरवठ्यामुळे सण-उत्सवात व्यत्यय येऊन उत्साहावर विरजण पडते. अशा घटना घडल्यास तात्काळ दुरुस्तीबाबत महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांनी तत्परता दाखवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर माजी नगरसेवक मोहम्मद नजीब, हाजी अब्दुल हमीद, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, फारुख सादीक तुंडीवाले , सय्यद अजहर, शाकेर खान, शेख वसीम, अब्दुल खालिख, आमेर मिर्झा, आतीफ़ अन्सारी, अशपाक अन्सारी, जावेद बेग, नाजिम मणियार, शेख अमीर, शेख नईम, निसार खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत चिंचखेडा शाळा प्रथम



**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथे आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत चिंचखेडा शाळेच्या मुलींनी लहान व मोठ्या दोन्ही गटात विजेतेपद तर मुलांच्या मोठ्या गटाने उपविजेतेपद पटकावत जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. सांघिक खेळा सोबतच मैदानी खेळात मुलींच्या लहान गटाने २०० मी रीले प्रकारात प्रथम तर मुलांनी १०० मी मधे व २०० मी मधे द्वितीय तर लांब उडी मधे तृतीय क्रमांक पटकावला.गावचे सरपंच भालचंद्र सरोदे, शाव्य समितीचे अध्यक्ष राजू सरोदे, गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे, विस्तार अधिकारी जिनेंद्र काळे, वसंता शेवाळे, खो-खोचे राज्यस्तरीय पंच प्रल्हाद काळे, संतोष साळोक, संदिप जाधव, गौतम राऊत, अनिल भोसले यांनी विजयी संघाचे व क्रीडा शिक्षक राजेंद्र भुजबळ यांचे अभिनंदन केले.

पान १ वरुन

### शिक्षक सक्षमीकरण ...

संदर्भात महाराष्ट्रातील शालेय शिक्षणामध्ये होणारे बदल, तपासणीचे बदल प्रश्नपत्रिका चे बदल, समता विकसन बदल इत्यादीवर हे प्रशिक्षण होणार असून तज्ञ मार्गदर्शक यास मार्गदर्शन करणार आहे.

### महसुल क्रिडा ...

त्याकरीता पाठपुरावा करण्याची त्यांनी यावेळी ग्वाही दिली. आमदार अर्जून खोतकर म्हणाले की, महसूल विभागाशी प्रत्येक नागरिकाचा कोणत्या ना कोणत्या कारणाने संबंध येतो, जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या कामे पार पाडण्याची जबाबदारी महसूल विभागावर असते. यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नेहमी कामाचा अधिकचा ताण असतो. परंतू अशाप्रकारच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या माध्यमातून त्यांचा ताण-तणाव कमी होण्यास नक्कीच मदत होईल. तसेच महसुल विभागीय स्पर्धेकरीता विविध जिल्ह्यातून आलेल्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचे या जिल्ह्याचा आमदार म्हणून करतो. जालना जिल्हा प्रशासनाने अतिशय उत्कृष्टरित्या या स्पर्धेची तयारी केल्याने त्यांचेही कौतुक केले.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे म्हणाले की, महसूल विभाग म्हटलं की, सर्व प्रकारच्या दाखल्यापासून ते जमिन व्यवहार, निवडणूक आदींशी लोकप्रतिनिधी, जनता यांचा संबंध येत असतो. आणि हे सर्व हाताळत आपण दैनंदिन प्रशासकीय कामकाज करतात. तुमचं दैनंदिन जीवन हे आव्हानात्मक झाले आहे. प्रशासकीय कामकाज करतांना विविध गोष्टींचा ताण हा सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांवर असतो. त्यामुळे अशा प्रकारच्या स्पर्धांच्या माध्यमातून आपल्यातल्या कला-क्रीडा गुणांना प्रोत्साहन मिळाव व आपला ताण दूर व्हावा हा मुख्य हेतू हा स्पर्धा आयोजनाचा आहे.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, जालना जिल्ह्याला विभागीय स्पर्धांचे आयोजन करण्याची संधी मिळाली. तीन दिवस चालणाऱ्या या क्रिडा स्पर्धांमध्ये एकुण ८४ क्रिडा प्रकारात १५०० खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. या आयोजनात विविध विभागाचे देखील चांगले सहकार्य मिळाले. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धांचा सर्वांनी आनंद घ्यावा. तसेच येथुन जातांना आपल्या पुढील प्रशासकीय कामकाजासाठी उत्साह घेऊन जावा असे आवाहन जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

प्रारंभी महसूल राज्य मंत्री यांच्या हस्ते क्रिडा ज्योत प्रज्वलीत करुन स्पर्धांची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर, बीड, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली या जिल्ह्यातील खेळाडूंनी राज्यमंत्र्याना पथसंचलनाच्या माध्यमातून मानवंदना दिली. यावेळी श्री. कदम यांनी सर्व खेळाडूंना प्रतिज्ञा दिली. तसेच यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी राज्य मंत्री श्री. कदम यांच्या हस्ते पथ संचलनाचा निकाल जाहिर करण्यात आला. यामध्ये जालना जिल्ह्याने प्रथम तर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने द्वितीय आणि नांदेड जिल्ह्याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती संभाजीनगर विभागीय महसुल क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा मध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर, बीड, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### विद्यार्थ्यांसाठी साई बिझनेस क्लबतर्फे व्यवसायिक ज्ञान संमेलन

# देशाला आर्थिक महासत्ता करायचे असेल तर युवकांनी नोकरी देणारे व्हा!

**पुणे -** युवकांचा देश म्हणून ख्याती असलेल्या भारत देशाला आर्थिक महासत्ता बनवायचे असेल तर याच युवकांनी आता नोकरी घेणारे नसून नोकरी देणारे होण्याची गरज आहे. व्यवसाय करायला एक चांगली आयडिया तुमच्याकडे असेल आणि मार्केटचा थोडा अभ्यास केला तर तुमचा व्यवसाय यशस्वी होऊ शकतो. असे मत साई बिझनेस क्लब आयोजित विद्यार्थी व्यवसायिक ज्ञान संमेलना प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केले.

महाविद्यालयीन विद्यार्थांना व्यवसायिक मार्गदर्शक मिळावे यासाठी साई बिझनेस क्लब द्वारे व्यवसायिक ज्ञान संमेलन चे आयोजन गुरुवार दि. १३ फेब्रुवारी रोजी घोले रोड, शिवाजीनगर येथील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात करण्यात आले होते. यामध्ये जे.एस.पी.एम युनिव्हर्सिटी पुणे, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी लॉ कॉलेज आणि अकेमी गृप ऑफ इन्स्टिट्यूट सहभागी झाले होते. साई बिझनेस क्लबच्या संचालिका प्रो. डॉ. कृती वजीर यांनी उपस्थित पाहुण्याचे स्वागत केले.



कार्यक्रमा दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात 'उद्याच्या घडीला सामाजिक उद्योजकांची भूमिका काय असेल' यावर डॉ. कीर्ती लोणगाणी व डॉ. रविंद्र नांदेडकर यांनी आपली मते व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. खुशाली ओझा यांनी या सत्राचे संचालन केले होते. डॉ. कीर्ती शाह यांनी 'मेमरी फोकस' वर लाइव्ह सेशन घेऊन विद्यार्थ्यांमध्ये स्फूर्ती आणली. 'ब्रँड तयार करणे आणि विक्री वाढवणे' या विषयावर प्रसाद गणपुले यांनी विचार मांडून डॉ विद्या नागरे यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. दुसऱ्या चर्चासत्रात डॉ. सुहास जातेगावकर व डॉ. कृती वाजिर यांनी नवीन स्टार्टप्स मधील चॅलेंजेस या विषयावर प्रकाश टाकला; याचे होस्टिंग डॉ. प्रभा सिंग यांनी केले होते.

कार्यक्रमाची सांगता करताना तुमच्या 'श्री आरोग्यम'च्या नवीन प्रॉडक्टचे लॉन्चिंग आयकर विभाग आयुक्त अजय केशरी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी श्री आरोग्यम चे संचालक सोहम पवार सहपरिवार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मेडल, ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल सिसोदिया आणि नादर कनन यांनी तर आभार प्रोफेसर डॉ. कृती वजीर यांनी मानले.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने ,समस्याग्रस्त व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतुने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्याचे ठरविले आहे.

त्यानुसार तालुकास्तरावर प्रत्येक तहसील कार्यालयात महिन्याचा चौथा सोमवार आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्येक महिन्याचा तीसरा सोमवार महिला लोकशाही दिन म्हणुन पाळण्यात येत आहे. सदर महिला लोकशाही दिनाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत करण्यात येते . दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी ११.०० ते १२.०० या वेळेत जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन होणार आहे. सदर महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जालना येथे सादर करावी.

अर्ज स्विकृतीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार, निवेदन दोन प्रतीत सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या-त्या स्तरावर, विधिमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तरावर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही.

शासन निर्णयाप्रमाणे महिलांनी प्रथम संबंधित तहसीलदार यांचेकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी, तालुका महिला लोकशाही दिनात एक महिन्याच्या आत कार्यवाही न झाल्यास संबंधित महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनात अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लवकर जास्तीत-जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बालविकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. तरी महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसील कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत-जास्त लाभ घ्यावा, असे जिल्हा माहिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.